# प्रकरण १४

रुग्णालयाने आपली कर्तव्ये बजावण्याकरिता ठरविलेले नियम

1. रुग्णालयाच्या बाहयरुग्ण विभागात येणा-या त्या त्या विभागाच्या वैद्यकिय अधिका-यांना लवकरात लवकर तपासवे.
2. आपत्कालीन सेवेसाठी असणा-या वैद्यकिय अधिका-यांने आपत्कालीन रुग्णाला लगेच तपासून लवकरात लवकर औषधोपचार सुरु करावे.
3. सर्व आंतर रुग्णांना सकाळी १०.०० च्या आत आणि जशी गरज असेल तसे तपासावे.
4. प्रयोगशाळेतील तपासण्या रुग्ण ज्या दिवशी रुग्णालयात येतो त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी सकाळी कराव्यात.
5. क्ष-किरण फोटो आणि विद्युत हृदयस्पंदन आलेख गंभीर आजारी असणा-या रुग्णांचे त्याच दिवशी सकाळी कराव्यात.
6. कोष्टकात समाविष्ट असलेली सत्र औषधे दररोज सर्व रुग्णांना उपलब्ध करावीत.
7. आंतररुग्णांना कोष्टकात समाविष्ट नसलेल्या औषधांची गरज पडल्यास ती लवकरात लवकर उपलब्ध करुन दयावीत.
8. एखादी तक्रार रुग्णालयातील अधिका-यांकडे आल्यास लवकरात लवकर तिचे निवारण करावे.
9. परिचाारिकांनी सर्व रुग्णांना उ-तम सेवा पुरवावी.
10. रुग्णालयातील सर्व कर्मचा-यांनी रुग्णांशी सहानुभुतीने व सौजन्याने वागावे.
11. धर्मदाय निधी गरिब व गरजु रुग्णांच्या मदतीसाठी वापरावा.